
REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# चंद्रपूर जिल्हयातील पर्यटन उद्योगाच्या असंतुलीत विकासाचा स्थलांतरीत परप्रांतीय मजुरांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीवर झालेला परिणाम




हर्षा भाउराव भगत
पी.एच.डी. स्कॉलर विद्यार्थी

**सारांश**

पर्यटनाच्या दृष्टीने पूर्व विदर्भातील अनेक जिल्हे हे महत्वाचे ठरतात जुन्या काळातील शिल्पकलेचा नमुना असणारे मंदीर विविध सरोवरे अत्यंत घनदाट व पशूपक्षीनी परीपूर्ण अभयारण्ये गडचीरोलीची चंद्रपूर वर्धा, भंडारा (पवनी) येथील शिलालेख यामुळे पर्यटनाला चालना मिळू शकणा—या अनेक बाबी येथे सहज उपलब्ध आहेत. या संदर्भात विशषतत्वाने चंद्रपूर जिल्हयाचा विचार केल्यास अभयारण्यांचा जिल्हा म्हणून चंद्रपूरची ओळख आहे. जगप्रसिध्द ताडोबा अभयारण्यातील व्याघ्रदर्शनासाठी आज हजारो लोक रोज शहरास भेट दत असतात आज या पर्यटनाबाबत लोकांमध्ये माहीतीचा अभाव शास्त्रशुध्द माहीती नसणे शहरातील रस्त्यांचा प्रश्न हॉटेल्सबाबत निश्चित माहीती नसणे इत्यादी व अशा अनेक समस्यांमुळे विशेषत्वाने चंद्रपूर जिल्हयात अथवा शहरात वास्तव्य करून प्रेक्षणिय स्थळे पाहण्याच्या संदर्भात लोकांमध्ये अत्साहाचा अभाव जाणवतो. हा नकारात्मक भाव बाजुला ठेवला तर जे पर्यटक शहरात येतात त्याचा निश्चितच अनुकुल व प्रतिकुल प्रभाव परप्रांतीय मजुरांच्या सामाजिक व आर्थिक जीवनावर पडलेला दिसून येतो. परप्रांतीय मजूर हे प्रामुख्याने मजूरी छोटे मोठे धंदे तसेच कृषीकामगार म्हणून कार्यरत असल्याचे दिसून येते पर्यटकांचा लोंढा चंद्रपूरकडे वाढल्यास निश्चितच लहान—लहान व्यवसायीकांना त्याचा फायदा होतो. आर्थीकदृष्टया थोडीफार मजबूती प्राप्त झाल्यास सामाजिक जीवनावर देखिल सकारात्मक व अनुकूल परिणाम होतो. शहरातील मजूरीसाठी याच प्रप्रांतीय वर्गातून मोठया प्रमाणात कमी मजूरीवर सहज मजूर प्राप्त होत असतात पर्यटनाचा समतोल व सातत्याने विकास होत राहल्यास या वर्गाला नियीमत स्वरूपात मजूरी मिळण्यास तसेच छोटया मोठया उद्योगव्यवसायात गुंतलेल्या व्यावसायीकांना देखील निश्चितच त्याचा फायदा होईल. परंतू त्यासाठी मुंबई अथवा पश्चित महाराष्ट्राच्या धर्तीवर या विभागाचा प्रयत्नाच्या बाबतीत विकास होणे काळाची गरज आहे.

## प्रस्तावना :

पर्यटनाच्या दृष्टीकोनातून पूर्व विदर्भाला फार मोठी देणगी लाभलेली आहे. मोठया नद्या व संगमे, ऐतिहासिक स्थळे, धार्मिक स्थळे, जंगल वनस्पती, वन्यप्राणी, नैसर्गिक सौदर्य इ. मोठया प्रमाणात लाभलेले आहे. अशा ठिकाणांकडे पर्यटक आकर्षित होण्याच्या दृष्टीकोनातून प्रस्तूत अभ्यास महत्वाचा आहे.

महाराष्ट्र राज्याच्या पूर्व सीमेवर पूर्व विदर्भाचे स्थान आहे. या पूर्व विदर्भाला नागपूर विभाग म्हणूनही ओळखल्या जाते. या प्रदेशात नागपूर, वर्धा,चंद्रपूर,गोंदीया, भंडारा आणि गडचिरोली या जिल्हयांचा समावेश असून उत्तरेला मध्यप्रदेश, पूर्वेला छत्तीगड तर दक्षिणेला आंध्रप्रदेश आहे. या प्रदेशात एकूण 64 तालुके असून एकूण भौगोलिक क्षेत्र 51,336 चौ.कि.मी. इतके आहे. 2001 च्या

जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या 1,06,82,000 इतकी आहे. या प्रदेशात 27,560 चौ.कि.मी. क्षेत्र जंगलव्याप्त आहे. या प्रदेशातून राष्ट्रीय महामार्ग 6 व 7 गेलेले आहेत. हवामान मान्सून प्रकारचा असून उन्हाळा तीव्र असतो. उन्हाळयातील सरासरी तापमान 350 उ. असते. हया प्रदेशातून वैनगंगा ही सर्वात मोठी नदी असून वर्धा, कन्हान, वैनगंगा, इंद्रावती हया नद्या महत्वाच्या आहेत.

## परिकल्पना :

पूर्व विदर्भात उंच पर्वतीय क्षेत्र, नदी संगमे, नैसर्गिक वनस्पती, व्याघ्र प्रकल्प, मोठेमोठे सिंचन प्रकल्प यासोबतच काही असामान्य व्यक्तींचे कार्यक्षेत्र इत्यादी र्प्यटकांना आकर्षित करणारी स्थळे आहेत. त्यामूळे पर्यटन उद्योग हा या विभागासाठी महत्वाचा उद्योग आहे. या क्षेत्राात हा उद्योग झपाटयाने वाढून संतुलित विकास घडवून आणणे शक्य आहे.

## उदिष्टये :

पूर्व विदर्भातील पर्यटन उद्योगाचा विकास असंतुलीत झालेला आहे. हे अभ्यासाने हया प्रस्तूत शेधनिबंधाचे मुख्य उदिदीष्ट आहे हे अभ्यासताना पर्यटन स्थळे कोणती ? विकास किती प्रमाणात झालेला आहे ? आणि हा भाग अविकसीत का आहे वर्तमान स्थितीत पर्यटन स्थळांची स्थिती काय आहे ? हे अभ्यासने प्रस्तूत अभ्यासाचे दुययम उदिदीष्ट आहे.

## चंद्रपुर व पूर्व विदर्भातील पर्यटन स्थळे :

सर्वसामान्यपणे दैनंदिन कामातून विसंगती मिळावी म्हणून काही लोक प्रवासाला विशिष्ट उदिदष्ट बाहेतर ठेवून निघतात व त्यांचा प्रवास म्हणजेच पर्यटन होय असे मानण्यास काही हरकत नाही. हे पर्यटन एक दिवसाचे किंवा एक महिण्याचे सुध्दा असू शकते. वर्तमान काळात पर्यटन हा एक महत्वाचा व्यवसाय आणि उद्योग बनलेला आहे. काही देशांची अर्थव्यवस्था ही पर्यटनावरच अवलंबून आहे.

पर्यटन उद्योगात पर्यटकांना आकर्षित करतील अशी स्थळे, त्या पर्यटन स्थळी जाण्याकरीता प्रवास साधनांची व्यवस्था, पर्यटन स्थळी किंवा जवळपास निवास करता येईल अशी राहण्याची व जेवणाची व्यवस्था आणि पर्यटकांना सुरक्षा प्रदान करणे हया चार बाबी अतिशय महत्वाच्या आहेत.

पूर्व विदर्भात या पर्यटन उद्योगाच्या आधारभूत सुविधा विचारात घेउन पर्यटन स्थळांचा अभ्यास केलेला आहे.

### पूर्व विदर्भातील विविध प्रकारच्या पर्यटन केंद्रांची संख्या :

| अ.क. | जिल्हये | नैसर्गिक | धार्मिक सौदर्य स्थळे | प्राचीन व स्थळे | समाजिक व ऐतिहासीक स्थळे | एकूण सांस्कृतिक |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वर्धा | 3 | 1 | 0 | 2 | 6 |
| 2 | नागपूर | 4 | 3 | 1 | 2 | 10 |
| 3 | भंडारा | 2 | 3 | 1 | 0 | 6 |
| 4 | गेंदिया | 3 | 0 | 1 | 0 | 4 |
| 5 | चंद्रपूर | 3 | 1 | 1 | 2 | 7 |
| 6 | गडचिरोली | 6 | 1 | 5 | 1 | 13 |
| | पूर्वविदर्भ | 21 | 9 | 9 | 7 | 46 |

पूर्व विदर्भात एकूण 46 पर्यटन स्थळे असून त्यांना वरील प्रमाणे 4 भागात विभाजीत केले आहे. परंतू वर्तमान स्थितीत यातील काही पर्यटन स्थळे ही स्थानिक लोकांच्या दृष्टिने महत्वाची आहेत.

### नैसर्गिक सौंदर्य स्थळे :

नैसर्गिक पर्यटन स्थळांमध्ये नवेगांव बांध, रामटेक, पेच व्याघ्र प्रकल्प, ताडोबा व्याघ्र प्रकल्प, नागझिरा वन्यजीव अभयारण्य व बोर वन्यजीव अभयारण्य ही फक्त 6 पर्यटन स्थळे पूर्व विदर्भातील वर्तमान स्थितीत महत्वाची आहेत. उर्वरीत 15 पर्यटन स्थळे पर्यटकांना आकर्षित करतील अशी असली तरी ती दुर्गम भागात असल्यामुळे अजूनही त्यांचा विकास झालेला नाही.

### सामाजिक व सांस्कृतिक पर्यटन स्थळे :

पूर्व विदर्भात सामाजिक व सांस्कृतिक पर्यटनाची अनेक स्थळे आहेत. त्यात प्रामुख्याने असामान्य व्यक्तींनी वास्तव्य केल्यामुळे आणि त्यांच्या कार्यामुळे विशेष जगप्रसिध्द प्राप्त झाली आहे. या थोर महापुरूषांच्या कार्यामुळे पर्यटक अशा स्थळांकडे आकर्षित होतात. वर्धा जिल्हयात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे वास्तव्य असलेला सेवाग्राम आश्रम, तसेच भूदान चळवळीचे प्रनेते विनोबा भावे यांचे पवनार आश्रम हे वर्धा जिल्हयातील महत्याची ठिकाणे आहेत. तर चंद्रपूर जिल्हयात बाबा आमटे यांचा वरोरा येथील आनंदवन हे ठिकाण वैशिष्टयपूर्ण आहे. तर गडचिरोली जिल्हयात आदिवासींच्या विकासासाठी झटणारे डॉ. अभय बंग आणि डॉ. राणी बंग यांचा चातगांव येथील सर्च जगविख्यात आहे. त्याच प्रमाणे आदिवासींची सेवा करणारे प्रकाश आणि विकास आमटे यांचा हेमलकसा येथील लोक बिरादरी प्रकल्प प्रसिध्द आहे.

पूर्व विदर्भात अनेक नैसर्गिक आणि वैशिष्टयपूर्ण ठिकाणे आहेत. यात चूलबंद नदी संगम, वैनगंगा नदी संगम, प्राणहिता, गोदावरी नदी संगम, चंद्रपूर जिल्हयात चिमूर येथील बालाजी देवस्थान, चंद्रपूर जिल्हयातील विविध वैशिष्टयपूर्ण उद्योग इत्यादी अशी अनेक स्थळे आहेत. परंतू त्यांचा विकास न झाल्यामुळे आज ही ठिकाणे पर्यटनाच्या परिभाषेत किंवा संज्ञेत मोहत नाहीत.

### असंतुलीत विकासाच्या समस्या :

पर्यटन विकासाच्या दृष्टिने व उल्लेखित केल्याप्रमाणे ज्या बाबी आवश्यक आहेत नेमकया त्याच बाबींचा अभाव काही पर्यटन स्थळांच्या ठिकाणी आहे. ज्या ठिकाणी पर्यटकांना आवश्यक असणा—या सोयी सुविधा उपलब्ध आहेत त्याचा विकास झालेला आहे. उर्वरीत काही भाग नैसर्गिक सौदर्याने नटलेला असला तरी सोयी सुविधांच्या अभावामुळे अविकसित राहिलेला आहे.

### संतुलित विकासाच्या उपाययोजना :

पर्यटन अद्योगाचा विचार केल्यास पर्यटन स्थळे ही परस्परांपासून खूप अंतरावर नाहीत. पूर्व विदर्भातील सर्वच स्थळे ही परस्परांपासून 50 ते 80 कि.मी. अंतरावर आहेत. परंतू पर्यटन स्थळे, रेस्ट हाउस, भोजनाची व्यवस्था, हॉटेल्स, वाहतूकीची साधने, सुरक्षा या गोष्टींचा अभाव आहे. अनेक पर्यटन स्थळाच्या ठिकाणी शासकीय विश्राम गृहे असली तरी ती नेहमीच शासकीय अधिकारी आणि पदाधिकारी यांच्याकरीता राखीव असतात. पर्यटकांना ती उपलब्ध होउ शकत नाही. त्यामुळे मोठया शहराला लागून असणारी पर्यटन स्थळे म्हणजे पेच,रामटेक,खिंडसी, चंद्रपूर नागपूर यांचा थोडयाफार प्रमाणात विकास झालेला आहे. परंतू गडचिरोली, भंडारा, गोंदिया आणि चंद्रपूर जिल्हयाचा काही भाग हो थोड लांब अंतरावर असल्यामुळे येथील पर्यटन स्थळे अद्यापही अविकसीत आहेत.

### संदर्भसूची :

1. जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, पूर्व विदर्भातील सर्व जिल्हे.
2. जनगणना पुस्तिका, पूर्व विदर्भातील सर्व जिल्हे.
3. पर्यटन विकास महामंडळ वार्षिकांक, महाराष्ट्र राज्य
4. विविध वर्तमान पत्रातील लेख